# राशिभविष्य - डिसेंबर, २०११.

**दामले दादा (dadadamle@hotmail.com )**

==============================================================

**(१) मेष-** गुरु-मंगळ शुभ योगामुळे या राशीच्या क्रीडापटू युवक-युवतींना काळ अनुकुल, प्रगतिकारक आणि महत्त्वाकांक्षा पुरी होण्यास अनुकुल असा आहे. याच राशीत असलेल्या गुरुमुळे शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राहील. बौद्धिक क्षेत्रातील नोकरी-व्यवसाय असणारांना, लेखकवर्गाला काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण संततीच्या आरोग्यविषयक समस्या किंवा आचरणविषयक समस्या त्रस्त करतील. गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या सप्तमस्थानी असलेल्या शनिमुळे जीवनसाथीच्या अनारोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. काहींना कुसंगतीचा त्रास सहन करावा लागेल.

महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या मंडळींना असह्य मनस्तापामुळेच शारीरिक अनारोग्य सहन करावे लागेल. नोकरीत वरिष्ठांशी मतभेद, वाद होतील. जपा. उत्तरार्धातही वडील व्यक्तींचा विरोध व मानसिक ताण सहन करीतच काळ व्यतीत करावा लागेल. म्हणून मनावर संयम ठेवा, सहनशील व्हा, मौनव्रत धारण करा व काळास सामोरे जा, म्हणजे महिन्याच्या पूर्वार्धात शुक्राच्या अनुकुलतेमुळे काही मनोनुकुल घटना घडून होणारा मनस्ताप सुसह्य होईल व सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र-नेपच्यून प्रतिकुल होणार असल्याने नोकरी-व्यवसायात मनाविरुद्ध घटना घडण्याची शक्यता दिसते. तसेच आर्थिक घोटाळे,आर्थिक नुकसान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या राशीच्या व्ययस्थानी असलेला हर्षलही नको ते प्रसंग निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा.

**(२) वृषभ-** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या पूर्वार्धात मन व बुद्धीवर ताबा ठेवून व सहनशील बनून आचरण केले तरच घरादाराला सहन करावा लागणारा असह्य मनस्ताप टळू शकेल. महिन्याच्या पूर्वार्धात रवि-मंगळ अशुभ योगामुळे संघर्षमय विरोधी शक्तींचा जोर उफ़ाळून येतो व माणसे बेफ़ाम बनतात. व त्यांच्या हातून नकोते घडण्याची शक्यता असते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि-मंगळ शुभ योग होत असल्याने सेनादलातील व पोलीसदलातील अधिकारी मंडळींना धाडसी व धडाडीच्या प्रसंगाना सामोरे जाण्यास संधी मिळेल व त्या संधीचे सोने करता येईल. या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचा स्वभाव गुलहौशी, सुखासीन होणे संभवते. त्यामुळे वाहन चालविताना मात्र सावधानतेनेच आचरण केले पाहिजे. नपेक्षा अपघातभय संभवते. जपा. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरीत असणारांना वाईट मार्गाने प्रसिद्धी मिळविणे नको असेल तर त्यांनी वाममार्ग धन सहज प्राप्त होणे शक्य असले तरी तो मोह कटाक्षाने टाळावाच. नोकरी-व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. तरीही

खाणव्यवसाय, कोळसा व्यापार, लोखंडी सामानाचे विक्रेते, मानसिक रोग तज्ञ, द्रव पदार्थांचे व्यापारी, साहित्यनिर्मिती, उच्च बौद्धिक संशोधन  अशा क्षेत्रांत कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. दांपत्यजीवनात गैरसमज, संशय, मतभेद, असहकार अशापैकी कारणांनी मनस्ताप होऊ नये यासाठी संयम. सहनशीलता व मौनव्रत या गुणांचा अवलंब केलात तर परिस्थिती फ़ारशी बिघडणार नाही. तसेच जीवनसाथीचे अनारोग्य, संततीचे आजार यांकडे लक्ष देणे शक्य होईल. महिन्याच्या पूर्वार्धात गुरु-शुक्राच्या शुभ योगामुळे या राशीच्या काही भाग्यवंतांना भूमिलाभ, धनलाभ किंवा व्यवसायात भरभराट किंवा अचानक प्रसिद्धी मिळण्याची शक्यता दिसते. मित्रांशी भांडणे, वादविवाद होणे संभवते. जपा.

**(३) मिथुन-** रवि-मंगळाच्या अनुकुलतेने या राशीच्या शासकीय, निम-शासकीय सेवेत कार्यरत असणारांना तसेच शनि-गुरुच्या अनुकुलतेने वकिली व अन्य चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या ज्या मंडळींचा अन्य जातिधर्माच्या मंडळींशी व्यावसायिक वा व्यापारी संबंध आहे, अशांना काळ लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात शुक्रमुळे तर उत्तरार्धात रविच्या प्रतिकुलतेमुळे दांपत्यजीवनात बिघाड होणे संभवते. त्यामुळे गहरे नैराश्य येणे शक्य आहे. तसेच काहींना पोटाच्या दुखण्याचा, अपचनाचा, मूत्राशविकाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे काहींना सूचक स्वप्ने पडतील; तर अध्यात्मात रस असणारांना उपासनेत प्रगती होत असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या काही मंडळींना
दूरच्या प्रवासाचे किंवा परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या केतूमुळे स्वभाव लहरी, चंचल व विक्षिप्त होणे शक्य असते. पण प्रिय दैवताची उपासना किंवा शिवोपासना असेल तर मन ब बुद्धी स्थिर राहून लहरीपणा संयमित राहील. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी जाणाऱ्या शुक्रामुळे जन्मकुंडलीतील योगानुसार काहींना भूमिलाभ तर काहींना अर्थलाभ होणे शक्य आहे. तसेच काहींना कर्तृत्व सिद्ध झाल्यामुळे प्रसिद्धी मिळेल. व्यापार-व्यवसायात भरभराट होत असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या गुरुमुळे इच्छा-आकांक्षा पूर्ण होतीलसे दिसते. मैत्रीसंबंधात वाढ होईल, या राशीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणात अपेक्षित यश लाभेल व प्रगती होईल. या राशीच्या विवाहेच्छूंना विवाहयोगही संभवतो.

**(४) कर्क-** या राशीच्या मंडळींना या महिन्याचे ग्रहमान फ़ारसे अनुकुल नाही , असेच म्हणावे लागेल. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात मन शांत व बुद्धी स्थिर ठेवून नम्रतेचे आचरण करावे, व काळ व्यतीत करावा असे आग्रहाने सांगावेसे वाटते. जीवनाच्या सर्वच आघाड्यांवर विरोधी परिस्थिती असल्याचा अनुभव येईल. केवळ

या राशीच्या दशम स्थानी असलेल्या गुरु ग्रहाच्या व हर्षलच्या अनुकुलतेने. शिक्षणक्षेत्र, उच्च शास्त्रीय संशोधन क्षेत्र, बौद्धिक क्षेत्र असे कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व अर्थलाभदायक होऊ शकेल. मंगळामुळे स्वभाव हट्टी बनेल, शारीरिक श्रम व दगदग सहन करावी लागल्यामुळे थकावट जाणवेल. मन संतप्त झाल्यामुळे शारीरिक उष्णता भडकेल व उष्णतेचे विकार बळावतील. काहींना डोळ्याच्या दुखण्याचा त्रास होईल, तर काहींना घसा, दाढा, मान यांपैकी काही आजाराचा त्रास सहन करावा लागेल. आर्थिक देणे वाढेल, पण आर्थिक येणे वसूल होण्यात विलंब, घोटाळे निर्माण होण्याची शक्यता दिसते . दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. अकारण दगदग करू नये. या राशीच्या मंडळींना संततिविषयक समस्यांना तोंड द्यावे लागेल किंवा संततीच्या अनारोग्याची काळजी घ्यावी लागेल. जलभय, विषभय आहे. जपा. या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे वा परदेशगमनाचे योग संभवतात.

**(**५) सिंह - हट्टी स्वभाव व मानापमान फ़ार या स्वाभाविक दोषांमुळे या राशीच्या मंडळींना अकारण श्रम व दगदग होऊन शारीरपीडेस तोंड द्यावे लागेल. तसेच उष्णतेच्या विकारांचा त्रास सहन करावा लागेल. या राशीच्या काही युवकयुवतींना मनोनुकुल नोकरी किंवा अपेक्षित कार्यक्षेत्र मिळेल. पण एखादी भावंडविषयक चिंता त्रस्त करील. विविध कारणांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळणे अशक्य होईल. मन अस्वस्थ राहील. पण शुक्रामुळे महिन्याच्या पूर्वार्धात काही प्रमाणात सुखसमाधान लाभेल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे दांपत्यजीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. अपघातभय आहे. जपा. या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात गुरु ग्रहाचा फ़ार मोठा आधार मिळणार आहे. त्यामुळे नोकरी-व्यवसायात उत्कर्ष होण्याची शक्यता दिसते. तसेच या राशीच्या मंडळींच्या आंतरिक गुणांचा विकास होत असल्याचा अनुभव येईल. विशेष करून या राशीच्या ज्या मंडळींना अध्यात्मात रस आहे त्यांना आध्यात्मिक उपासनेत प्रगती होत असल्याचे सात्विक सुखसमाधान लाभेल. शनि-मंगळ शुभ योगामुळे पोलीसखाते, सेनादले अशा प्रकारच्या कष्टमय कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, कष्टाचे समाधान देणारा असा सिद्ध होईल.

**( ६)** कन्या **-** या राशीच्या मंडळींचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा २/३ भाग पूर्ण झाला असून आता केवळ १/ ३ भाग शिल्लक राहिला आहे. पण गतकाळ अतिशय मनस्ताप देणारा गेला असेल तरच आता उर्वरित काळात परिस्थिती हळूहळू सुधारेल व काही जीवनात आनंददायक परिवर्तन होत असल्याचा अनुभव येईल. पण या राशीच्या मंडळींना सध्या शनि-मंगळ हे दोन विरोधी शक्तींचे ग्रह प्रतिकुल आहेत. त्यामुळे आर्थिक चिंता,

अनपेक्षित खर्च करावा लागणे, कुटुंबात अनिष्ट घटना घडणे, जुन्या दबलेल्या प्रकरणांचा पुन्हा त्रास सुरू होणे, गैरसमजुतीने वाद, भांडणे होणे, मानहानी होणे, या राशीच्या पुरुषांना स्त्रीवर्गाकडून त्रास होणे अशापैकी मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत मन व बुद्धी शांत, स्थिर ठेवा, सहनशील व्हा व नम्रतेचे आचरण करा. म्हणजे संत तुकोबांच्या - " महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती " या वचनाची सत्यता अनुभवता येईल व होणारा मनस्ताप खूपच सुसह्य होईल. रवि-राहूच्या अनुकुलतेमुळे नोकरी-व्यवसायात प्रगती व अर्थलाभ होणे संभवते. पण मतभेद, वाद यांमुळे भावाभावात वितुष्ट निर्माण होण्याची शक्यता दिसते. कदाचित काहींना कोर्टकचेरी करण्याचा प्रसंग येणेही शक्य आहे. असे असले तरी शुक्राच्या अनुकुलतेने मित्रसुख, संततिसुख व कौटुंबिक सुखसमाधान मिळू शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात आरोग्यविषयक समास्या त्रस्त करतील. सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अतिशय हळवा झाला असेल तर त्यांना उगीचच काल्पनिक चिंतांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. म्हणून शक्यतो मन शांत व स्वस्थ ठेवा, अति विचार करू नका. हर्षलमुळे दांपत्यजीवनात मतभेद, वाद होणे संभवते. भागीदारीत व्यवसाय करत असणारांनी भागीदाराशी मतभेद, गैरसमज होणार नाहीत याची काळजी घ्यावी. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. अशाही परिस्थितीत या राशीच्या ज्या भाग्यवंतांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचा योग आहे अशांना अचानक धनलाभ होणे संभवते.

**(७) तुळा-** या राशीच्या मंडळींना शनि ग्रहाची साडेसाती आहे. सध्या याच राशीत प्रथम स्थानी शनि आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील व त्यामुळे गहरे नैराश्य येईल..स्वत:च्या व जीवनसाथीच्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. कुटुंबातील प्रिय व्यक्तींचे काही कारणाने स्थलांतर होण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या काहीजणांना डोळ्याच्या दुखण्याचा आजार होणे संभवते. कुटुंबात अनिष्ट असे काही घडू नये व आप्तेष्टात भांडणे होऊ नयेत म्हणून विशेष काळजी घ्यावी लागेल. मिळकतीपेक्षा अधिक खर्च होणार असल्याने काही मंडळींना आर्थिक समस्येला तोंड द्यावे लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. रवि-शुक्राच्या अनुकुलतेमुळे शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना काळ अनुकुल होईल व या राशीच्या काही कर्तृत्ववान मंडळींना बढती, किंवा उच्च पद मिळण्याची शक्यता आहे. मात्र या राशीच्या सामान्य नोकरी करत असलेल्या मंडळींना कष्ट, दगदग सहन करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती करून घ्यावी लागेल. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या शेतकरी मंडळींना शेतमाल उत्पादनातून अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. या

राशीच्या सर्वांनाच गृहसौख्य लाभेल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने विवाहेच्छूंचेविवाह संपन्न होतील. काहींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. तसेच जुने स्नेहसंबंध अधिक दृढ होतील. या राशीच्या काही मंडळींचे मनसध्या अतिशय भावनाशील झाले असावे. तसेच ज्यांना अध्यात्मविद्न्यानात रस आहे त्यांना उपासनेत प्रगती होत असल्याचा अनुभव येईल. मित्रांशी वितुष्ट येणार नाही यासाठी काळजी घ्यावी लागेल. या राशीच्या काही मंडळींना दात, तोंड यांचे आजार, तसेच काहींना रक्तविकार, त्वचाविकार अशापैकी कसल्या तरी आजाराचा त्रास सहन करावा लागेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(८) वृश्चिक-** या राशीच्या मंडळींना नुकतीच शनि ग्रहाची साडेसाती सुरू झाली आहे. वृश्चिक राशी ही मंगळ ग्रहाच्या मालकीची राशी म्हणजे शनि ग्रहाच्या शत्रूची व चंद्राची नीच राशी आहे. चंद्र म्हणजे मन. त्यामुळे या राशीच्या मंडळींना साडेसातीच्या काळात सतत मानसिक त्रास व त्यामुळे शारीरिक अनारोग्य होण्याची शक्यता असते. त्यासाठी हनुमानचालिसास्तोत्राचे श्रद्धेने पठण केल्यास होणारा मनस्ताप सुसह्य होईल. या राशीच्या मंडळींना शानिच्या साडेसातीचा पहिला १/३ काळ अतिशय त्रासाचा व मनाविरुद्ध घटना घडण्याचा असणार आहे. कारण शनि ग्रह या राशीच्या व्ययस्थानी असणार आहे. पण तो स्वत:च्या उच्च राशीत असल्यामुळे होणारा त्रास सुसह्य होईल. सतत मन शांत ठेवा, बुद्धी विकृत होऊ देऊ नका, अत्यंत सहनशील व्हा. उतावळेपणा, राग, संताप यांवर ताबा ठेवा, मतप्रदर्शन करू नका, म्हणजे होणाऱ्या मनस्तापाने शारीरिक अनारोग्य होणार नाही. विशेष करून आर्थिक व्यवहारात फ़सवणूक होणार नाही याची काळजी घ्या. सदैव सावधानतेने आचरण करा. होणारे अपमान सहन करा. रक्तदाब, हृदयविकार, वातविकार असणारांनी विशेष जपावे. आप्तेष्टांशी होणारी भांडणे टाळा. त्यासाठी मूक व्रत धारण करा, अति विचार करू नका, जागरणे टाळा. नपेक्षा नेत्रविकार बळावतील. अशा परिस्थितीत शुक्राच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या काही भाग्यवंतांना मानसन्मान प्राप्त होईल, तर काहींना भूमिलाभ, धनलाभ, प्रतिष्ठा असे काही प्राप्त होईल. या राशीच्या काही मंडळींच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडणे संभवते. जपा. नोकरदार मंडळींना कामाचा असह्य ताण सहन करावा लागेल. पण या राशीच्या सर्व प्रकारच्या कलाकारांना कलाविष्कारास काळ अनुकुल होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या गुरुमुळे आरोग्य उत्तम राहील; पण मन अस्थिर राहिल्यास हातून नको ते घडेल. जपा. जीवनसाथीशी वाद टाळा. या राशीच्या उच्च बौद्धिक शिक्षण क्षेत्र व यांत्रिकतांत्रिक शिक्षण क्षेत्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रगतीच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल.

**(९) धनु-** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ संमिश्र प्रकारचे अनुभव देणारा

असाच असणार आहे. शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; पण हर्षलमुळे वास्तुसुख मिळेलच याबाबत शंका आहे. व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे दांपत्यजीवनात अपेक्षित सुखसमाधान लाभण्याची शक्यता कमी आहे. पण अपेक्षित संततिसुख मात्र लाभेल. शैक्षणिक क्षेत्र कोणतेही असो, या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. विशेष करून वकिली, अकौन्टन्सी विषयाचे विद्यार्थी व यांत्रिकतांत्रिक विषयाचे विद्यार्थी यांना उच्च प्रगतीस काळ अधिक अनुकुल होईल, मनाविरुद्ध घटना, कार्य अडथळे यांमुळे असह्य मनस्ताप होऊन शारीरिक अनारोग्यबळावण्याची शक्यता आहे. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी मन अगदी शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. अति विचार करू नये. या राशीच्या काही मंडळींचे मन अत्यंत हळवे झाले असल्यामुळे त्यांना खूप थकल्यासारखे वाटेल. पण आध्यात्मिक उपासनेत रस असेल तर अशा उपासनेद्वारे मन:शक्ती शाबूत ठेवणे शक्य होईल. या राशीच्या काहींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग संभवतात. पण प्रवासात खूप त्रास व मानहानी होण्याची शक्यता दिसते. जपा. खाण उद्योग, कोळसा, लोखंड यांचे व्यापारी, यांना काळ इतरांपेक्षा अधिक अनुकुल व लाभदायक जाईल. तसेच उच्च बौद्धिक शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या सर्व प्रकारच्या कलाकारांना व क्रीडापटूंना महिन्याचा बराचसा काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल.

**(१०) मकर-** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध काळ नोकरी-व्यवसायास अनुकुल, प्रगतिकारक वा लाभदायक होणार आहे. पण महिन्याच्या उत्तरार्धात बराचसा प्रतिकुल असेल. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी जे काही साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थिती-
मुळे पराभव, नुकसान होत असल्याचा अनुभव येईल व त्यामुळे मन अस्वस्थ होऊन नैराश्य बळावेल. तसेच खर्चाचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. मात्र या काळात कोणाच्या आर्थिक जबाबदाऱ्या स्वीकारू नका तसेच आर्थिक घोटाळे होणार नाहीत याची काळजी घ्या. तसे घडले तर शुक्राच्या अनुकुलतेमुळे मानसिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत असलेल्या हर्षलमुळे उच्च शैक्षणिक व उच्च शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना प्रगती व यश लाभण्यास काळ अनुकुल होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या गुरुमुळे कुटुंबसुख व गृहसौख्य लाभेल; स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार होतील, पण आप्तेष्टमंडळींकडून त्रास होणे संभवते. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल असला तरी अनारोग्यामुळे किंवा अन्य काहीही कारणाने शिक्षणात अडथळे निर्माण होतील असे वाटते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या

मंगळामुळे उष्णताविकारांचा जोर होऊन अनारोग्य होणे संभवते. काहींना मूळव्याध, काहींना अन्य उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. शिवाय कष्ट-दगदग अधिक होणेही शक्य आहे. सर्व प्रकारचे अपघातभय आहेच. त्यामुळे सतत सावधानतेने सर्व प्रकारचे व्यवहार होणे अगत्याचे होईल. जपा.

(११) कुंभ - सध्या या राशीच्या मंडळींचे मन अत्यंत भावनाशील व कोमल असे झाले असावे, असे वाटते. त्यामुळे मनावर होणाऱ्या थोड्याही प्रतिकुल संस्कारांमुळे एकदम गहरे नैराश्य येत असावे, असे दिसते. तसेच या राशीच्या काही मंडळींचा स्वभाव हट्टी, हेकट, अस्थिर, लहरी, चंचल झाला असण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामुळे हातून विचित्र आचरण घडत असेण्याची, अविचाराने खर्च होत असण्याची शक्यता आहे. जिभेला लगाम नसल्यामुळे या राशीच्या काही मंडळींकडून इतरेजन दुखावले जात असण्याचीही शक्यता दिसते. जपा. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे काही प्रमाणात कौटुंबिक सुखसमाधान मिळेल; पण भावंडांकडून त्रास होणे संभवते. या राशीच्या साहित्यिकांचे ग्रंथलेखन प्रसिद्ध होईल. काहींना प्रवासाचे योग येताल. काहींना अर्थलाभ होईल; तर काहींना ऐषारामाची साधने प्राप्त होतील. समजूतदारपणाचा स्वभाव असेल तरच गृहसौख्य व वास्तुसुख मिळू शकेल. या राशीच्या सप्तम स्थानी मंगळ असल्यामुळे दांपत्यजीवनात कटकटी निर्माण होणे संभवते. तसेच जीवनसाथीच्या अनारोग्यामुळेही अस्वस्थ वाटेल. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा, या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी भागीदाराशी मतभेद होणार नाहीत, याची काळजी घ्यावी. शनि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात थोडा प्रतिकुल होईल. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या कर्तृत्वसंपन्न मंडळींना बढती, उच्च पद असे काही तरी मिळेल. तसेच व्यापार, व्यवसायात प्रगती होत असल्याचा अनुभव येईल.

**(१२) मीन-** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात केवळ गुरु ग्रह अनुकुल असून रवि-शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल होतील. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. महिन्याच्या उत्तरार्धात व्यवसायात प्रगती होत असल्याचा अनुभव येईल. मधून मधून अर्थप्राप्ती होईल. कर्जफ़ेड होणेही शक्य दिसते. बरेचसे ग्रहमान प्रतिकुल असल्याने काही मंडळींना मानसिक व्यग्रता व गहरे नैराश्य येणे संभवते. सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी झाला असावा असे वाटते. त्यामुळे कोणी अनुकुल सल्ला दिला तरी तो सहन होत नसावा. त्यामुळे अधिकच मनस्ताप होत असावा. या राशीची लहान मुलेही सध्या अत्यंत हूड व व्रात्य झाली असल्याचा अनुभव येत असेल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनिमुळे सतत अपेक्षाभंग व असमाधानकारक घटना घडत असल्यास मन अशांत राहील. काहींना मोठ्या आजाराशी

मुकाबला करावा लागेल. नोकरी-व्यवसायात महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असून उत्तरार्धात मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या काही मंडळींना उष्णतेच्या विकारांचा असह्य त्रास सहन करावा लागेल. ताप येणे, अंगावर फ़ोड येणे, गळवे होणे, इजा होणे, रक्तविकार, हृदयविकार बळावणे अशापैकी आजार संभवतात. काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल. चोरी किंवा अन्य कारणाने आर्थिक हानी होणेही संभवते. जपा. या राशीच्या व्यापारी मंडळींना महिन्याच्या उत्तरार्धात स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना व गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल.

**=====00000=====**